मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवड महापालिका आरक्षण सोडत जाहीर

## 32 प्रभागांतून 128 नगरसेवकांची निवड होणार; 128 पैकी 92 जागा आरक्षित

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आरक्षण सोडत प्रक्रिया आज चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे संपन्न झाली. राज्य निवडणूक आयोगाने या आरक्षण सोडतीच्या कामासाठी पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून उपस्थित होते,त्यांच्या नियंत्रणाखाली सदर आरक्षण सोडत प्रक्रिया पूर्ण झाली.



**सोडतीनुसार निघालेले आरक्षण खालील प्रमाणे..**

**प्रभाग क्रमांक १ – चिखली गावठाण – मोरेवस्ती**
अ – ओबीसी राखीव
ब – महिलांसाठी
क – महिलांसाठी
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक २ – बोऱ्हाडेवाडी – जाधववाडी – कुदळवाडी**
अ – ओबीसी महिलांसाठी राखीव
ब – महिलांसाठी राखीव
क – ओपन
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक ३ – चऱ्होली-मोशी गावठाण – वडमुखवाडी – चोवीसावाडी – डूडूळगाव**
अ – अनुसूचित जाती महिलांसाठी राखीव
ब – ओबीसी
क – महिलांसाठी
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक ४ – दिघी – बोपखेल**
अ – अनुसूचित जाती महिलांसाठी राखीव
ब – अनुसूचित जमाती
क – ओबीसी महिलांसाठी राखीव
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक ५ – गवळीनगर – चक्रपाणी वसाहत**
अ – ओबीसी महिलांसाठी राखीव
ब – ओबीसी
क – महिलांसाठी
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक ६ – धावडेवस्ती – भगत वस्ती – सद्गुरुनगर**
अ – ओबीसी महिलांसाठी राखीव
ब – ओबीसी
क – महिलांसाठी राखीव
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक ७ – भोसरी गावठाण – सॅन्डवीक कॉलनी**
अ – ओबीसी
ब – महिलांसाठी राखीव
क – महिलांसाठी राखीव
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक ८ – इंद्रायणीनगर – गवळीमाथा – बालाजीनगर**
अ – अनुसूचित जातीसाठी राखीव
ब – ओबीसी महिलांसाठी राखीव
क – महिलांसाठी राखीव
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक ९ – नेहरूनगर – मासुळकर कॉलनी – खराळवाडी – गांधीनगर**
अ – अनुसूचित जातीसाठी राखीव
ब – ओबीसी महिलांसाठी राखीव
क – महिलांसाठी राखीव
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक १० – शाहूनगर – संभाजीनगर – मोरवाडी – विद्यानगर**
अ – अनुसूचित जाती महिलांसाठी राखीव
ब – ओबीसी महिलांसाठी राखीव
क – ओपन
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक ११ – पूर्णानगर – कृष्णानगर – घरकुल प्रकल्प – अजंठानगर**
अ – अनुसूचित जातीसाठी राखीव
ब – ओबीसी महिलांसाठी राखीव
क – महिलांसाठी राखीव
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक १२ – तळवडे गावठाण – रुपीनगर – त्रिवेणीनगर**
अ – ओबीसी WE राखीव
ब – महिलांसाठी राखीव
क – महिलांसाठी राखीव
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक १३ – निगडी गावठाण – सेक्टर २२ – ओटास्किम – यमुनानगर**
अ – अनुसूचित जातीसाठी राखीव
ब – ओबीसी महिलांसाठी राखीव
क – महिलांसाठी राखीव
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक १४ – चिंचवड स्टेशन – मोहननगर – रामनगर – काळभोरनगर – दत्तवाडी**
अ – ओबीसीसाठी राखीव
ब – महिलांसाठी राखीव
क – महिलांसाठी राखीव
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक १५ – आकुर्डी गावठाण – गंगानगर – वाहतूक नगरी**
अ – ओबीसीसाठी राखीव
ब – महिलांसाठी राखीव
क – महिलांसाठी राखीव
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक १६ – मामुर्डी – किवळे – वाल्हेकरवाडी – गुरुद्वारा**
अ – अनुसूचित जातीसाठी राखीव
ब – ओबीसी महिलांसाठी राखीव
क – महिलांसाठी राखीव
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक १७ – बिजलीनगर – प्रेमलोक पार्क – भोईरनगर**
अ – अनुसूचित जाती महिलांसाठी राखीव
ब – ओबीसीसाठी राखीव
क – महिलांसाठी राखीव
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक १८ – चिंचवड गावठाण – केशवनगर – वेताळनगर**
अ – ओबीसी महिलांसाठी राखीव
ब – महिलांसाठी राखीव
क – ओपन
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक १९ – उद्योगनगर – विजयनगर – भाटनगर – भाजी मंडई पिंपरी कॅम्प**
अ – अनुसूचित जाती महिलांसाठी राखीव
ब – ओबीसी महिलांसाठी राखीव
क – ओपन
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक २० – संत तुकारामनगर – महात्मा फुलेनगर – लांडेवाडी – कासारवाडी**
अ – अनुसूचित जातीसाठी राखीव
ब – ओबीसी महिलांसाठी राखीव
क – महिलांसाठी राखीव
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक २१ – पिंपरीगाव – मिलिंदनगर – जिजामाता रुग्णालय – वैभवनगर**
अ – अनुसूचित जाती महिलांसाठी राखीव
ब – ओबीसीसाठी राखीव
क – महिलांसाठी राखीव
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक २२ – काळेवाडी विजयनगर – पवनानगर – ज्योतिबा नगर – नढेनगर**
अ – ओबीसी महिलांसाठी राखीव
ब – महिलांसाठी राखीव
क – ओपन
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक २३ – थेरगाव गावठाण – पडवळनगर – साईनाथनगर**
अ – अनुसूचित जाती महिलांसाठी राखीव
ब – ओबीसीसाठी राखीव
क -महिलांसाठी राखीव
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक २४ – थेरगाव दत्तनगर – गुजरनगर – आदित्य बिर्ला रुग्णालय**
अ – ओबीसीसाठी राखीव
ब – महिलांसाठी राखीव
क – महिलांसाठी राखीव
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक २५ – वाकड – पुनावळे – ताथवडे**
अ – अनूसूचित जातीसाठी राखीव
ब – ओबीसी महिलांसाठी राखीव
क – महिलांसाठी राखीव
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक २६ – पिंपळे निलख – विशालनगर – कस्पटेवस्ती – वेणुनगर – रक्षक सोसायटी**
अ – अनूसूचित जातीसाठी राखीव
ब – ओबीसी महिलांसाठी राखीव
क – महिलांसाठी राखीव
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक २७ – काळेवाडी तापकीरनगर – रहाटणी गावठाण**
अ – अनूसूचित जातीसाठी राखीव
ब – ओबीसी महिलांसाठी राखीव
क – महिलांसाठी राखीव
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक २८ – पिंपळेसौदागर – रामनगर – कुणाल आयकॉन**
अ – ओबीसीसाठी राखीव
ब – महिलांसाठी राखीव
क – महिलांसाठी राखीव
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक २९ – पिंपळेगुरव – सुदर्शननगर – जवळकरनगर**
अ – अनुसूचित जाती महिलांसाठी राखीव
ब – अनुसूचित जमाती महिलांसाठी राखीव
क – ओबीसीसाठी राखीव
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक ३० – दापोडी – फुगेवाडी – कासारवाडी**
अ – अनुसूचित जाती राखीव
ब – अनुसूचित जमाती महिलांसाठी राखीव
क – ओबीसीसाठी राखीव
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक ३१ – सांगवी विनायकनगर – गणेशनगर – उरो रुग्णालय**
अ – अनुसूचित जाती महिलांसाठी राखीव
ब – ओबीसीसाठी राखीव
क – महिलांसाठी राखीव
ड – ओपन

**प्रभाग क्रमांक ३२ – सांगवी गावठाण**
अ – अनुसूचित जाती महिलांसाठी राखीव
ब – ओबीसीसाठी राखीव
क – महिलांसाठी राखीव
ड – ओपन

# चिखली गावठाण-मोरेवस्तीमध्ये राजकीय तापमान वाढले

## प्रभाग क्रमांक एक मध्ये साने कुटुंब विरुद्ध भाजपचा मुकाबला रंगण्याची चिन्हे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर चिखली गावठाण-मोरेवस्ती (प्रभाग क्रमांक १) येथे राजकीय समीकरणांना वेग आला आहे. या प्रभागातील अ (ओबीसी), ब (महिला), क (महिला) आणि ड (खुला) अशा चारही गटांमध्ये दावेदारांची स्पर्धा रंगू लागली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडून दत्ता काका साने यांच्या निधनानंतर त्यांचा मुलगा यश साने प्रबळ दावेदार म्हणून पुढे आले आहेत. तसेच राष्ट्रवादीकडून विकास साने इच्छुक आहेत.




विशेष म्हणजे, या वेळी ओबीसी पुरुष गट आरक्षित झाल्याने सुरेश म्हेत्रे यांच्या संधी वाढल्या आहेत. स्पर्धेत असलेले कुंदन गायकवाड (SC) यांना यावेळी मैदानाबाहेर जावे लागले असून, ते प्रभाग ११ मधून तयारी करत आहे. दुसरीकडे, भारतीय जनता पक्षाकडून महिला गटांमध्ये साधना मळेकर, शितल जितेंद्र यादव, प्राची गणेश मळेकर, रूपाली पांडाभाऊ साने, सोनम विनायक मोरे या इच्छुक महिलांची नावे पुढे आली आहेत.

पुरुष गटात जितेंद्र भाऊ यादव, गणेश मळेकर, विनायक आबा मोरे, पांडाभाऊ साने, हे भाजपचे इच्छुक उमेदवार आहेत. इतर मधून अमृत सोनवणे सर्जेराव भोसले, रावसाहेब थोरात यांचा समावेश आहे. राजकीय विश्लेषकांच्या म्हणण्यानुसार, प्रभाग क्रमांक १ मध्ये दोन्ही साने आणि भाजपचे स्थानिक नेतृत्व यांच्यात चुरस निर्माण झाली आहे. साने या दोन्ही कुटुंबाचे परंपरागत वर्चस्व राखण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून प्रयत्न सुरू आहेत, तर भाजपकडून तिकीटासाठी अनेक अनुभवी आणि नव्या चेहऱ्यांची मोठी रांग लागली आहे. पक्षातील इच्छुकांची गर्दी लक्षात घेता, तिकिट न मिळालेल्या काही उमेदवारांचे पक्षांतर होण्याचीही शक्यता राजकीय वर्तुळात वर्तवली जात आहे.

२०१७ च्या निवडणुकीत याच प्रभागात भाजपा, राष्ट्रवादी, शिवसेना आणि अपक्ष अशा चौरंगी लढती झाल्या होत्या. त्यावेळी मतांचे विभाजन झाल्यामुळे निकालांवर परिणाम झाला होता. आगामी निवडणुकीतही अशीच कठीण स्पर्धा दिसण्याची चिन्हे आहेत.

# तब्बल 618 कुटुंबांना रेशनकार्ड तर 119 रक्तदात्यांनी केले रक्तदान

## आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिनी सामाजिक कार्यकर्ते निखिल बोऱ्हाडे यांचा अभिनव उपक्रम

**पिंपरी | प्रतिनीधी**

भोसरी विधानसभेचे आमदार महेश दादा लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त निखिल शिवाजी बोऱ्हाडे सोशल फाउंडेशन यांच्यावतीने विविध उपक्रमाचे आयोजन मोशी या ठिकाणी केले होते या उपक्रमात प्रामुख्याने रक्तदान शिबिर व बारा अंकी असलेले अद्यावत नवीन राशन कार्ड शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या उपक्रमात तब्बल 618 कुटुंबियांनी सहभाग घेतला व आपले रेशन कार्डचे काम मार्गी लावून घेतले या विधायक कामामुळे नागरिकांच्या चेहऱ्यावर आयोजकांना समाधान पाहायला मिळाले, तसेच रक्ताचा तुटवडा जाणवतो म्हणून निखिल बोऱ्हाडे सोशल फाउंडेशनच्या वतीने रक्तदान शिबिराला देखील मोठा प्रतिसाद मिळाला यामध्ये 119 रक्तदात्यांनी रक्तदान केले.

या शिबिराला भारतीय जनता पार्टीचे आमदार महेशदादा लांडगे यांचे बंधू तथा टाटा मोटर्स कामगार युनियनचे अध्यक्ष श्री. सचिन भैय्या लांडगे यांनी सदिच्छा भेट दिली. पिंपरी चिंचवड शहराचे माजी उपमहापौर शरदराव बोऱ्हाडे, माजी महापौर राहुलदादा जाधव, युवानेते नीलेश बोराटे यांची यावेळी उपस्थिती पहायला मिळाली.

यावेळी सचिन भैय्या लांडगे म्हणाले की निखिलदादा यांचा सामाजिक उपक्रम नियमित चांगला पाहायला मिळतो.सातत्याने ते विविध उपक्रम घेत असतात त्यामध्ये आवर्जून प्रत्येक वेळी रक्तदान शिबिराचा नेहमी सहभाग करतात, रक्ताचा तुटवडा पाहता निखिल बोऱ्हाडे सोशल फाउंडेशन हे उत्कृष्ट प्रकारे काम करते यातून निश्चितच आम्हाला देखील आनंद मिळतो.




हे दोन्ही शिबिर निखिल बोऱ्हाडे यांच्या पुढाकाराने यशस्वीपणे पार पडली. पिंपरी चिंचवड शहरातील प्रभाग 2 मधील प्रत्येक नागरिकांच्या,प्रत्येक समस्या अडचणीच्या वेळी धावून जाणारे युवा नेतृत्व तथा भारतीय जनता पार्टीचे युवा नेते, सामाजिक कार्यकर्ते निखिल बोराडे यांच्या वतीने अनेक वर्षापासून असे सामाजिक उपक्रम राबविले जातात.

निखिल बोऱ्हाडे आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी तयारी करत असून,प्रभाग 2 मधील मतदारांच्या आग्रहाखातर आपण या निवडणुकीसाठी तयारी करत असल्याचे निखिल बोऱ्हाडे यांनी सांगितले.तसेच भारतीय जनता पक्षाच्या वतीने संधी मिळाली तर नक्कीच आपण या प्रभाग 2 मधून प्रभागाचे नेतृत्व करण्यासाठी सज्ज आहोत.असे ही यावेळी निखिल बोऱ्हाडे यांनी सांगितले.



# पुणे महापालिका निवडणूक आरक्षण सोडत जाहीर!

## आरक्षण सोडतीनंतर राजकीय चित्र स्पष्ट; काही प्रभागांत माजी नगरसेवक येणार समोरासमोर

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली आहे. पुण्यातील गणेश कला क्रीडामंच येथे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेच्या निवडणुकीसाठी आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली आहे.

महापालिकेच्या 165 जागांसाठी अनुसूचित जातीसाठी 22 जागा, अनुसूचित जमातीसाठी 2 जागा, नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी 44 जागा, सर्वसाधारण 97 जागा आरक्षित केल्या होता. त्यापैकी अनुसूचित जाती महिलांसाठी 11 जागा, अनुसूचित जाती सर्वसाधारण 11 जागा, अनुसूचित जमाती महिला 1 जागा, अनुसूचित जमाती सर्वधारण 1 जागा, नागरिकांचा मागासवर्ग महिलांसाठी 22 जागा, नागरिकांचा मागासवर्ग सर्वसाधारण 22 जागा, सर्वसाधारण महिलांसाठी 49 जागा, सर्वसाधारण 48 जागा चिठ्ठीद्वारे आरक्षित करण्यात आल्या आहेत. प्रारूप आरक्षण सोडत 17 तारखेच्या आधी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

प्रभाग निहाय हरकती आणि सूचना दाखल करण्याचा कालावधी हा 17 नोव्हेंबर ते 24 नोव्हेंबरच्या दुपारी 3 पर्यंत राहणार आहे. महापालिका येथील निवडणूक कार्यालय आणि क्षेत्रीय कार्यालयात हरकती आणि सूचना दाखल करता येणार आहे. ईमेल आणि गठ्ठ्याद्वारे हरकती आणि सूचना स्वीकारल्या जाणार नाहीत.




### अंतिम आरक्षण सोडत 2 डिसेंबरला..

» आरक्षणाचे प्रारूप १७ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध केले जाणार आहे. या प्रारूप आरक्षण सोडतीवर १७ ते २४ नोव्हेंबर या कालावधीत हरकती आणि सूचना नोंदविता येणार आहेत. २४ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत हरकती आणि सूचना नोंदविण्याची अंतिम मुदत आहे. हरकती सूचना महापालिका मुख्यालय, निवडणूक कार्यालय किंवा पालिकेच्या प्रभाग कार्यालयात नोंदविता येणार आहेत. पालिकेची वेबसाइट, ई-मेल किंवा ऑनलाइन प्राप्त होणाऱ्या हरकती आणि सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत. त्यानंतर २ डिसेंबर रोजी अंतिम आरक्षण सोडत जाहीर होणार आहे.

### पुणे महापालिका एकूण जागा 165

» अनुसूचित जमातींसाठी (एसटी) २ जागा , १ महिला राखीव
» अनुसूचित जातींसाठी (एससी) २२ जागा ११ महिला राखीव
» ओबीसींसाठी ४४ जागा — २२ जागा महिला राखीव
» सर्वसाधारण ९७ जागा — ४९ महिला राखीव

### आरक्षण सोडत प्रभाग निहाय यादी

**प्रभाग क्रमांक १**
अ. महिला अनुसूचित जाती (SC)
ब. अनुसूचित जमाती (ST)
क. महिला ओबीसी
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक २**
अ. महिला अनुसूचित जाती (SC)
ब. ओबीसी
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक ३**
अ. ओबीसी महिला
ब. ओबीसी
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक ४**
अ. अनुसूचित जाती (SC)
ब. महिला ओबीसी
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक ५**
अ. ओबीसी
ब. सर्वसाधारण महिला
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक ६**
अ. अनुसूचित जाती (SC)
ब. महिला ओबीसी
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक ७**
अ. महिला अनुसूचित जाती (SC)
ब. महिला ओबीसी
क. सर्वसाधारण
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक ८**
अ. अनुसूचित जाती (SC)
ब. महिला ओबीसी
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक ९**
अ. महिला अनुसूचित जमाती (ST)
ब. ओबीसी
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक १०**
अ. ओबीसी
ब. सर्वसाधारण महिला
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक ११**
अ. ओबीसी
ब. सर्वसाधारण महिला
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक १२**
अ. महिला अनुसूचित जाती (SC)
ब. ओबीसी
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक १३**
अ. अनुसूचित जाती (SC)
ब. महिला ओबीसी
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक १४**
अ. महिला अनुसूचित जाती (SC)
ब. ओबीसी
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक १५**
अ. महिला अनुसूचित जाती (SC)
ब. ओबीसी
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक १६**
अ. महिला ओबीसी
ब. सर्वसाधारण महिला
क. सर्वसाधारण
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक १७**
अ. अनुसूचित जाती (SC)
ब. महिला ओबीसी
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक १८**
अ. ओबीसी
ब. सर्वसाधारण महिला
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक १९**
अ. महिला ओबीसी
ब. सर्वसाधारण महिला
क. सर्वसाधारण
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक २०**
अ. ओबीसी
ब. सर्वसाधारण महिला
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक २१**
अ. अनुसूचित जाती (SC)
ब. महिला ओबीसी
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक २२**
अ. महिला अनुसूचित जाती (SC)
ब. ओबीसी
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक २३**
अ. अनुसूचित जाती (SC)
ब. महिला ओबीसी
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक २४**
अ. महिला ओबीसी
ब. सर्वसाधारण महिला
क. सर्वसाधारण
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक २५**
अ. ओबीसी महिला
ब. ओबीसी
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक २६**
अ. अनुसूचित जाती (SC)
ब. महिला ओबीसी
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक २७**
अ. अनुसूचित जाती (SC)
ब. महिला ओबीसी
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक २८**
अ. महिला अनुसूचित जाती (SC)
ब. ओबीसी महिला
क. सर्वसाधारण
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक २९**
अ. ओबीसी
ब. सर्वसाधारण महिला
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक ३०**
अ. ओबीसी
ब. सर्वसाधारण महिला
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक ३१**
अ. ओबीसी
ब. सर्वसाधारण महिला
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक ३२**
अ. महिला अनुसूचित जाती (SC)
ब. ओबीसी
क. सर्वसाधारण
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक ३३**
अ. महिला ओबीसी
ब. सर्वसाधारण
क. सर्वसाधारण
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक ३४**
अ. ओबीसी
ब. सर्वसाधारण महिला
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक ३५**
अ. महिला ओबीसी
ब. सर्वसाधारण महिला
क. सर्वसाधारण
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक ३६**
अ. अनुसूचित जाती (SC)
ब. महिला ओबीसी
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक ३७**
अ. ओबीसी
ब. सर्वसाधारण महिला
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक ३८**
अ. ओबीसी महिला
ब. ओबीसी
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण महिला
इ. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक ३९**
अ. महिला अनुसूचित जाती (SC)
ब. ओबीसी
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक ४०**
अ. अनुसूचित जाती (SC)
ब. महिला ओबीसी
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक ४१**
अ. महिला अनुसूचित जाती (SC)
ब. ओबीसी
क. सर्वसाधारण महिला
ड. सर्वसाधारण

# पुणे महापालिकेतील उपायुक्तांच्या पदभारात झाले बदल

## महापालिकेत राज्य सरकारकडून गेल्या आठवड्यात तीन अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीवर बदली

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेत राज्य सरकारकडून गेल्या आठवड्यात तीन अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीवर बदली करण्यात आली आहे. त्यामुळे महापालिकेत उपायुक्त म्हणून काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या जबाबदारीत काही बदल करण्याचा निर्णय महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी घेतला आहे.

नवीन फेरबदलांमध्ये मिळकतकर विभागाची जबाबदारी नव्याने महापालिकेत आलेल्या रवी पवार यांच्याकडे देण्यात आली आहे. तर मध्यवर्ती भांडार विभागाचा कारभार आशा राऊत यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. राज्य सरकारच्या सेवेतून प्रतिनियुक्तीवर महापालिकेत आलेल्या अधिकाऱ्यांना चांगल्या खात्यांची जबाबदारी तर महापालिकेच्या सेवेत असलेल्या उपायुक्तांकडे दुय्यम खात्यांची जबाबदारी देत आयुक्तांनी अन्याय केल्याची चर्चा या निमित्ताने सुरू झाली आहे.




महापालिकेच्या सेवेत तीन उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीने बदली करण्यात आली आहे. यामध्ये तुषार बाबर, आशा राऊत आणि संतोष टेंगले यांचा समावेश आहे. यापैकी राऊत आणि बाबर यांना महापालिका आयुक्त राम यांनी महापालिकेच्या सेवेत रुजू करून घेतले आहे. उपायुक्त पदावरून सहायक आयुक्तपदी नियुक्ती केलेल्या प्रसाद काटकर यांच्या बदलीला मॅटने स्थगिती दिल्याने त्यांच्या जागी प्रतिनियुक्तीवर आलेल्या टेंगले यांना अद्याप महापालिकेत रुजू करून घेण्यात आलेले नाही.

महापालिकेच्या सेवेतील उपायुक्तांसह राज्य सरकारच्या सेवेतून काही उपायुक्त महापालिकेत आल्याने आयुक्त राम यांनी यापूर्वी अधिकाऱ्यांवर दिलेल्या जबाबदारीत बदल केले आहेत. रविंद माळी यांच्याकडे आपत्ती व्यवस्थापन विभागाची जबाबदारी देण्यात आली आहे. महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाने नुकतेच हे आदेश काढले आहेत.

निवडणूक विभागाचे उपायुक्त प्रसाद काटकर यांच्याकडे महापालिका आयुक्तांचे विशेष कार्यकारी अधिकारी या पदाची जबाबदारी देखील देण्यात आली आहे. यापूर्वी मिळकतकर विभागाची जबाबदारी असलेल्या महापालिकेच्या सेवेतील अधिकारी अविनाश सपकाळ यांच्याकडे मोटार वाहन विभाग तसेच पर्यावरण विभाग देण्यात आला आहे.

**महापालिका विभागप्रमुखांच्या जबाबदारीत झाले हे फेरबदल ..**

१) संदीप कदम (घनकचरा व्यवस्थापन विभाग)

२) अविनाश सकपाळ (मोटार वाहन विभाग तसेच पर्यावरण विभाग)

३) आशा राऊत (मध्यवर्ती भांडार विभाग तसेच सुरक्षा विभाग सनियंत्रण)

४) निखील मोरे (भूसंपादन व व्यवस्थापन विभाग तसेच परिमंडळ क्र. ५)

५) संतोष वारुळे (परिमंडळ क्र. २ विभाग तसेच सांस्कृतिक केंद्र विभाग)

६) प्रशांत ठोंबरे (मालमत्ता व व्यवस्थापन विभाग तसेच दक्षता विभाग)

७) सोमनाथ बनकर (अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग)

८) अरविंद माळी (परिमंडळ क्र. ४ विभाग तसेच आपत्ती व्यवस्थापन विभाग)

९) राहुल जगताप (ई-प्रशासक (प्रभारी पदभार) तसेच माहिती तंत्रज्ञान विभाग)

१०) माधव जगताप (आकाशचिन्ह व परवाना विभाग तसेच अग्निशमन विभाग)

११) तुषार बाबर (माहिती व जनसंपर्क विभाग, सोशल मीडिया कक्ष तसेच मंडई विभाग)

१२) विजयकुमार थोरात (सामान्य प्रशासन विभाग, तांत्रिक विभाग तसेच बीओटी सेल)

१३) संदीप खलाटे (झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन तसेच पुणे मनपा चाळ विभाग वसाहती)

१४) विजय लांडगे (स्थानिक संस्था कर विभाग, जनगणना विभाग तसेच जनरल रेकॉर्ड विभाग)

१५) प्रसाद काटकर (निवडणूक विभाग, तसेच महापालिका आयुक्त यांचे विशेष कार्यकारी अधिकारी)

१६) किशोरी शिंदे (उपायुक्त प्रशासन अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय तसेच उपायुक्त विशेष विभाग)

१७) वसुंधरा बारवे (प्राथमिक शिक्षण विभाग, माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभाग संनियंत्रण तसेच प्रशिक्षण प्रबोधिनी)

१८) जयंत भोसेकर (समाज कल्याण विभाग, समाज विकास विभाग, मागासवर्ग विभाग तसेच दिव्यांग तक्रार निवारण अधिकारी)

१९) रवि पवार (कर आकारणी व कर संकलन विभाग, महात्मा फुले वाडा आरक्षित क्षेत्राचे संपादनचे कामकाज तसेच क्रीडा विभाग)

२०) रमेश शेलार (मुख्य सुरक्षा अधिकारी-सहाय्यक अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग प्रमुख तसेच उपायुक्त यांच्या अधिनिस्त कामकाज)

# पुरंदर विमानतळाचा महिनाअखेर ठरेल जमिनीचा मोबदला

## पुरंदर विमानतळाच्या भूसंपादनाचा अहवाल सरकारकडे मान्यतेसाठी पाठविला

**पुणे | प्रतिनीधी**

पुरंदर येथील प्रस्तावित विमानतळाच्या भूसंपादनासाठी करण्यात आलेली जमीन मोजणी आणि त्यासाठी देण्यात येणाऱ्या मोबदल्याच्या रकमेचा तपशील असलेला अहवाल मंगळवारी (दि. ११) राज्य सरकारकडे पाठविण्यात आला आहे. या अहवालाला मान्यता मिळाल्यानंतर जिल्हा प्रशासनाकडून जमिनीच्या मोबदल्याची रक्कम निश्चित होऊन त्याच्या वाटपाचे वेळापत्रक निश्चित होणार आहे. या महिनाअखेर या शेतकऱ्यांना देण्यात येणार मोबदल्याची रक्कम ठरेल, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.



### 240 हेक्टर जादा जमीन मिळणार

» विमानतळासाठी १ हजार २८५ हेक्टर अर्थात तीन हजार एकर भूसंपादन करण्यात येणार आहे. त्यापैकी सुमारे ५० हेक्टर जमीन ताब्यात देण्यास अद्याप संमती मिळालेली नाही. सर्व जमिनीची मोजणी झाली आहे. त्या व्यतिरिक्त अर्थात नकाशा बाहेरील २४० हेक्टर जमीन देण्याची तयारी शेतकऱ्यांनी दाखविली आहे. त्या जमिनीचीही मोजणी करण्यात येत आहे.

या भूसंपादनासाठी अंदाजे पाच हजार कोटी रुपये लागतील, असे डुडी यांनी यापूर्वी स्पष्ट केले आहे. यासाठी सात गावांतील १ हजार २८५ हेक्टर, अर्थात तीन हजार एकर भूसंपादन करण्यात येणार आहे. त्यातील सुमारे ३ ते ४ टक्के जमीन अद्याप ताब्यात आलेली नाही. हे क्षेत्र सुमारे ५० हेक्टर असून, नकाशाच्या बाहेरील सुमारे २४० हेक्टर क्षेत्र देण्यास शेतकऱ्यांनी संमती दिली असल्याचे डुडी यांनी सांगितले. या संमती मिळालेल्या जमिनीच्या मोजणीचे काम आता पूर्ण झाले आहे. त्याचा सविस्तर अहवाल पूर्ण करण्यास निर्धारित वेळेपेक्षा एका आठवडा जास्त लागला आहे. या अहवालावरच प्रत्येक शेतकऱ्याला त्याच्या जमिनीचा आणि शेतातील झाडे, विहीर, पाइपलाइन याचा मोबदला मिळणार आहे. त्यामुळे अहवाल तयार करताना काळजी घेणे गरजेचे होते. त्यानुसार आता हा प्रस्ताव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कायद्यातील ३२-१ तरतुदीनुसार राज्य सरकारकडे पाठविण्यात आला आहे, असे डुडी यांनी सांगितले.

या प्रस्तावाला राज्य सरकारची मान्यता मिळाल्यानंतर पुढील दोन आठवड्यांत ३२-३ नुसार शेतकऱ्यांचा मोबदला तयार करण्याचे काम पूर्ण होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. दरम्यान, जमिनीचा मोबदला आणि परतावा वाढवून मिळावा, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. त्याबाबत राज्य सरकारकडे चर्चा करू, असेही डुडी यांनी स्पष्ट केले आहे.